BDC LIBRARY
New Paper Clipping
A.Y. 2023-2024



# मराठी भाषा ज्ञानभाषा म्हणून वापरावी : अनिल पाटील

▲ **पाटण**, दि. २० : मराठी ही राजभाषा, ज्ञानभाषा, मातृभाषा व बोलीभाषा म्हणून मान्यता पावली आहे. आजच्या धावत्या युगात इंग्रजी ही जगण्याची भाषा बनत असली तरी संस्कृतीची खाण असणाऱ्या मराठी भाषेत व्यावहारिकता वापरल्यास ती चांगल्या पद्धतीने विकसित होऊ शकते म्हणून मराठी ही ज्ञानभाषा म्हणून वापरावी, असे मत बाळासाहेब देसाई महाविद्यालयाचे ग्रंथपाल अनिल पाटील यांनी व्यक्त केले.

येथील बाळासाहेब देसाई महाविद्यालयात मराठी भाषा संवर्धन पंधरवड्या निमित्ताने आयोजित विश्वकोश प्रदर्शन कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी डॉ. सौ. हेमलता काटे होत्या. यावेळी प्राचार्य डॉ. एस. डी. पवार, मराठी विभागप्रमुख डॉ. पी. जे. अहिवळे, मराठी साहित्य परिषदचे कार्यवाह डॉ. विनायक राऊत, ज्युनियर विभागाचे पर्यवेक्षक प्रा. दीपक दाभाडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

अनिल पाटील म्हणाले, उपयोजित मराठीने अनेक व्यावसायिक संधी निर्माण करून दिल्या आहेत. मराठी भाषेचा विचार केल्यास यातून सुप्त कलागुणांना वाव मिळवून भाषिक कौशल्य विकसित करता येतील. मराठी भाषेचा प्रचार व प्रसार या उद्दिष्टांसह रोजगाराभिमुख उपक्रमातून जास्तीत जास्त तरुण पिढीला आकर्षित करण्यासाठी मराठी भाषेला व्यवसायिक स्वरूप



**विश्वकोश प्रदर्शनप्रसंगी अनिल पाटील, डॉ. हेमलता काटे, डॉ. एस. डी. पवार, डॉ. पी. जे. अहिवळे व इतर.**

देणे आवश्यक आहे. मराठी भाषेच्या क्षेत्रात अनेक अर्थार्जनाच्या संधी उपलब्ध आहेत, त्याचा लाभ विद्यार्थ्यांनी घ्यावा. प्राचार्य डॉ. पवार यांनी महाराष्ट्र शासनाच्यावतीने १४ ते २८ जानेवारी या कालावधीत मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा केला जाईल. विद्यार्थ्यांनी आपली मातृभाषा म्हणून या उपक्रमामध्ये सक्रीय सहभाग घ्यावा, असे आवाहन केले. अध्यक्षीय मनोगतात डॉ. काटे म्हणाल्या, मराठी भाषा साहित्य आणि महाराष्ट्राची संस्कृती याचे संरक्षण, संगोपन, संवर्धन करण्याच्या हेतूने महाराष्ट्र शासनाने डिसेंबर १९८० मध्ये महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाची स्थापना केली. विश्वकोश मंडळाचे मुख्य कार्यालय वाई येथे कार्यरत आहे. सर्व विषयाचे ज्ञान मराठीत नोंदी स्वरूपात आणण्याचे कार्य हे मंडळ करते. महाविद्यालयातील उपक्रम हे विद्यार्थ्यांच्या विकासासाठी असतात. विद्यार्थ्यांनी त्यासाठी सक्रीय असणे आवश्यक आहे. तसेच विश्वकोश प्रदर्शनाचा सर्व प्राध्यापक, विद्यार्थी व विद्यार्थिनींनी लाभ घ्यावा. डॉ. पी. जे. अहिवळे यांनी प्रास्ताविकात विश्वकोश निर्मिती व त्याचे खंड याबाबतची माहिती दिली. डॉ. व्ही. एस. राऊत यांनी आभार मानले. कार्यक्रमास ग्रंथालयाचे कर्मचारी सौ. स्मिता मराठे, सूर्यकांत देवकांत, अस्मिता घाडगे यांच्यासह सर्व स्टाफचे विशेष सहकार्य लाभले. कार्यक्रमासाठी प्रा. श्रीनिवास पवार, प्रा. बळीराम लोहार, प्रा. जे. बी. झोरे, प्रा. सौ. वैशाली शिर्के, प्रा. श्रीगणेश गायकवाड यांच्यासह विद्यार्थी व विद्यार्थिनींची उपस्थिती होती.